क्रमांक : मुंमप्रविप्रा/बैठक/८४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे [पूर्व],
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ८ ऑक्टोबर, १९९६.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ९ सप्टेंबर, १९९६ रोजी झालेल्या ८४ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य

निमंत्रित :

शासनाचे प्रधान सचिव [ना. स्था. सं. ]
नगर विकास विभाग,
मंत्रालय.

प्रत अग्रेषित :

विधी सल्लागार,
मुं. म. प्र. वि. प्रा.
प्राधिकरणाचे अधिकारी

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## ८४ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ९ सप्टेंबर, १९९६ [सोमवार] |
| वेळ | : | दुपारी १२.०० वाजता |
| सभास्थान | : | मा. मुख्यमंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष, ६ वा मजला, मंत्रालय. |

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री. मनोहर जोशी<br>मा. मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री. रविंद्र माने<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री. राज पुरोहित<br>गृह निर्माण, कामगार व<br>सेवायोजन राज्यमंत्री | सदस्य |
| श्री. हरेश्वर पाटील<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. चंद्रकांत पडवळ<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री. वसंत डावखरे<br>विधान परिषद सदस्य | सदस्य |
| श्री. दिनेश अफझलपुरकर<br>शासनाचे मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. र. द. सिन्हा<br>शासनाचे अपर मुख्य सचिव [नगररचना],<br>नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री. गिरीश गोखले<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री. के. नलिनाक्षन<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको व<br>शासनाचे प्रधान सचिव [नास्थासं],<br>नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री. डी. टी. जोसेफ<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री. देवव्रत मेहता<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

बैठकीच्या प्रारंभी, अध्यक्षांच्या परवानगीने वडाळा येथे प्रस्तावित आंतरराज्य बसस्थानक व जर्मन सरकारच्या सहाय्याने शक्याशक्यता अभ्यास करावयाच्या लाईट रेल ट्रान्झिट या २ प्रकल्पांची माहिती पारदर्शिकांच्या मदतीने सादर करण्यात आली.

प्रस्तावित आंतरराज्य बसस्थानकाची गरज सर्वसामान्यपणे मान्य करण्यात आली. परंतु अशात-हेचे दुसरे आंतरराज्य बसस्थानक दहिसर-बोरिवली भागात सुध्दा उभारावे, तसेच मुंबईतील इतर भागात प्रवाशांच्या सोयीसाठी व वाहतुकीवर जादा ताण पडू नये म्हणून चढउताराच्या थांब्याची सोय करावी असे याबाबतीत सुचविण्यात आले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

<u>बाब क्र. १ :</u> <u>प्राधिकरणाच्या मागील [८३व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.</u>

ठराव क्र. ६७९ मध्ये "मुंबई महानगर प्रदेश" च्या ऐवजी "महाराष्ट्र" असा बदल करुन कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

<u>बाब क्र. २ :</u> <u>दिनांक ४ एप्रिल, १९९६ व दिनांक ३० मे, १९९६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या अनुक्रमे ८२ व्या व ८३ व्या बैठकींच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही.</u>

दोन्ही कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्र. ३ : केंद्र पुरस्कृत "महानगर योजना" – वित्तीय संस्थांकडून कर्ज.

केंद्र पुरस्कृत महानगर योजनेत समाविष्ट केलेल्या कामासाठी कर्जाचे वितरण करतांना कामाची प्रगती व दर्जा या बाबत संपूर्ण माहिती संबंधित संस्थांकडून घेऊन नंतर कर्ज वितरण करावे अशी सूचना करण्यात आली व ती मान्य करण्यात आली.

त्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६८८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं. म. प्र. वि. प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१[अ] अनुसार मुं. म. प्र. वि. निधीमधून रु. ६०. ४४ कोटी इतकी रक्कम अंतर्गत संस्थेस कर्ज म्हणून मुं. म. प्र. वि. प्राधिकरणात स्थापन करण्यात आलेल्या महानगर योजना-फिरता निधी मध्ये जमा करण्यास प्राधिकरण याद्वारे प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्यता देत आहे. या कर्जाच्या रक्कमेवर द. सा. द. शे. १५% व्याज आकारावे व दहा वर्षात कर्जाच्या रक्कमेची परतफेड करून घ्यावी."

बाब क्र. ४ : वसई-विरार क्षेत्रासाठीच्या उसगांव-तानसा पाणी पुरवठा योजनेसाठी सिडकोस वित्तीय सहाय्य.

या बाबीवर चर्चेच्या वेळी प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी, पाणीपुरवठा प्रकल्पासाठी द्यावयाच्या कर्जाचे प्रस्ताव महानगर प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करतांना राज्य शासनाच्या पाणी पुरवठा विभागाने त्या बाबत तयार केलेले निकष विचारात घ्यावेत, तसेच प्राधिकरणाचे व शासनाचे या बाबतचे निकष सारखे असावेत अशी सूचना केली व ती मान्य करण्यात आली.

विचाराधीन प्रस्ताव राज्य शासनाच्या निकषाप्रमाणे असल्याचे स्पष्टीकरण या बाबत देण्यात आल्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६८९ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, वसई-विरार क्षेत्रासाठीच्या उसगांव-तानसा क्षेत्रात असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या सामायिक कामांच्या

...४/-

कार्यवाहीसाठी प्राधिकरणाने सिडकोला रु. १२०३.४१ लाखाहून अधिक नसलेली रक्कम बाब टिप्पणीच्या परिच्छेद ६ मधील प्रस्तावानुसार आणि त्यामध्ये दिलेल्या शर्ती व अटींच्या अधीन राहून कर्जरूपाने देण्यास याद्वारे प्राधिकरण मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या प्रकल्पाच्या वित्तीय आकृतीबंधास पाणी पुरवठा विभागाची मान्यता मिळविण्यास व समयबध्द अनुदानास मान्यता मिळविण्याची आणि कर्जसहाय्य देण्यासंबंधी सिडकोशी योग्य कर्ज-करार करण्यास व त्यासंबंधीची इतर कार्यवाही करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. ५ : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तिसऱ्या मुंबई पाणी पुरवठा व जलनि:सारण प्रकल्पाकरिता प्राधिकरणाचे अर्थसहाय्य.

या बाबीवर चर्चा करतांना, तिसऱ्या मुंबई पाणी पुरवठा व जलनि:सारण प्रकल्पाच्या एकूण खर्चात वाढ झालेली आहे व एकूण खर्च रु. २७५ कोटीपर्यंत होईल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. त्यामुळे वाढीव खर्च लक्षात घेऊन प्राधिकरणाने द्यावयाचे ६० टक्के कर्ज रु. १६५ कोटीपर्यंत वाढवावे असेही महानगर आयुक्तांनी सुचविले. सूचना मान्य करून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६२० :

"असा ठराव करण्यात येत आहे की, तिसऱ्या मुंबई पाणी पुरवठा व जलनि:सारण प्रकल्पाच्या रु. २७५ कोटीहून अधिक नसलेल्या खर्चाची उर्वरित कामे पार पाडण्यासाठी प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस एकूण खर्चाच्या ६०% परंतु रु. १६५ कोटीहून अधिक नसलेली रक्कम बाब टिप्पणीच्या परिच्छेद ४ मधील आश्वासने पालिकेकडून घेऊन व परिच्छेद ५ मधील शर्ती व अटींच्या अधीन राहून कर्ज रूपाने देण्यास याद्वारे प्राधिकरण मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाच्या अधीन एकूण खर्च व कर्ज रक्कम निश्चित करण्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेशी योग्य कर्ज-करार करण्यास व त्यासंबंधीची इतर सर्व कार्यवाही करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

...५/-

बाब क्र. ६ : वसई-विरार पाणी पुरवठा योजनेच्या कार्यवाहीसंबंधी आवश्यक बाबींसाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६९१ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४६-क अंतर्गत प्राप्त झालेल्या तसेच यासंबंधी सहाय्यभूत ठरणा-या आपल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आधी मंजुरी दिलेल्या वसई-विरार पाणी पुरवठा योजनेच्या कार्यवाही संबंधीचे आपले सर्व अधिकार प्राधिकरण याद्वारे सुचविल्याप्रमाणे महानगर आयुक्तांना प्रत्यायोजित करीत आहे."

बाब क्र. ७ : सन १९९५-९६ सालचे प्राधिकरणाचे वार्षिक लेखे.

१९९५-९६ सालच्या प्राधिकरणाच्या लेख्यांना मान्यता देऊन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६९२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, विषय टिप्पणीसोबत सादर केलेले प्राधिकरणाचे १९९५-९६ चे वार्षिक लेखे यांची नोंद घेऊन प्राधिकरण त्यास मान्यता देत आहे."

बाब क्र. ८ : प्राधिकरणाचे चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक यांच्या धुलाई भत्त्यात वाढ.

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६९३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११, पोटकलम[२] मधील शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण दिनांक १ एप्रिल, १९९५ पासून मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे चतुर्थश्रेणी कर्मचारी व

वाहनचालक यांना दरमहा रु.३०/- धुलाईभत्ता प्रस्ताविल्याप्रमाणे देण्यास याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे."

बाब क्र.९ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील २ भूखंडाचे शाळेसाठी वितरण करणे बाबत.

राज्य शासनाने सादर केलेल्या सागरी क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यास केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाची मान्यता मिळाल्यावर याबाबतीतील देकार पत्र पाठवावे अशी सूचना करून प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६९४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, पूर्वीच्या निर्णयामध्ये फेरफार करून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] अनुसार मिळालेल्या अधिकारांचा व याबाबत त्यांस सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील भूखंड क्रमांक एससीएल-२, दि अमेरिकन स्कूल ऑफ मुंबई एज्युकेशन ट्रस्टला भाडेपट्टा रक्कम रु.८,४५,२५,०००/- [रु. आठ कोटी पंचेचाळीस लाख पंचवीस हजार फक्त] घेऊन ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने नेहमीच्या अटी व शर्तीवर नेमून देण्याच्या प्रस्तावाला मंजूरी देत आहे. असाही ठराव करण्यात येत आहे की, भूखंड क्र.एससीएल-१ चे वाटप करण्यासाठी जाहिरात देऊन पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात.

"आणखी असा ठराव करण्यांत येत आहे की, भाडेपट्टादराने अतिरिक्त परिबध्द क्षेत्र मिळण्याची विनंती केल्यास त्यांना देय असलेले अतिरिक्त परिबध्द क्षेत्र ०.५ पर्यंत त्याच दराने अतिरिक्त अधिमूल्य आकारून वापरणेस परवानगी देण्यांत यावी.

"आणखी असाही ठराव करण्यांत येत आहे की, महानगर आयुक्त यांना भाडेपट्टा कराराच्या नमूना "ड" व भाडेपट्टा विलेखाच्या नमूना "इ" मध्ये योग्य त्या सुधारणा करण्यास याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. १० : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील वाणिज्यिक भूखंड क्रमांक सी-१२ व सी-२९ चे अनुक्रमे वैश्य बँक लिमिटेड व ग्लोबल ट्रस्ट बँक लिमिटेड यांना केलेले वाटप-अधिमूल्याची शिल्लक ५०% रक्कम उभारण्यास मुदतवाढ देणेबाबत -

संबंधीत बँकांनी त्यांना, पूर्वी दिलेल्या मुदतवाढीबद्दल देय असलेले व्याज २८. ९. १९९६ च्या ऐवजी ३१. १०. १९९६ पर्यंत भरण्यास परवानगी द्यावी असा बदल करून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६९५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] ला अनुसरून मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे वैश्य बँक लिमिटेड व ग्लोबल ट्रस्ट बँक लिमिटेड यांना त्यांच्या कोणत्याही अटी शिवाय अधिमूल्याची राहिलेली ५० टक्के रक्कम भरण्यास दिनांक २८. ९. १९९६ नंतर ६ महिन्यांची आणखी मुदतवाढ, वार्षिक १८% व्याज आकारून तसेच वरील दोन्हीही वित्त संस्थांनी राहिलेल्या ५०% अधिमूल्याच्या रक्कमेवरील दिनांक २८. ९. १९९६ पर्यंत देय असलेले व्याज दिनांक ३१. १०. १९९६ पूर्वी भरले पाहिजे, या अटी सापेक्ष देण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे. मात्र व्याजाची रक्कम ३१. १०. १९९६ पर्यंत न भरल्यास दिलेली ही मुदतवाढ रद्द समजण्यात येईल.

"आणखी असाही ठराव करण्यांत येत आहे की, संबंधीत संस्थांना वरीलप्रमाणे कळविण्यास आणि याबाबतीत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. ११ : वांद्रे-कुर्ला संकुलासाठी असलेल्या विकास नियंत्रण विनियमांच्या विनियम क्र. ४ [दोन] अनुसार अनुज्ञेय असलेल्या जादा चटई क्षेत्र निर्देशांकासाठी अधिमूल्य वसूल करण्याबाबतचे धोरण व कार्यपध्दती.

महानगर आयुक्तांनी सूचविल्याप्रमाणे प्राधिकरणाने आगाऊ/ठेव रक्कम फक्त रोखीनेच घेण्याचे व ती पूर्वी प्रस्ताविल्याप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेने दिलेल्या

हमी पत्राच्या स्वरूपात न **स्वीकारण्याचे** मान्य केले व त्याप्रमाणे खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ६९६ :</u>

"असा ठराव करण्यांत येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०, पोटकलम [१] च्या खंड [सी] अनुसार वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून असलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे वांद्रे-कुर्ला संकुलासाठी असलेल्या सर्वसाधारण विकास नियंत्रण विनियमांच्या विनियम क्र. ४ [दोन] अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून याद्वारे शैक्षणिक, वैद्यकीय आणि इतर संस्थात्मक इमारतींना अनुज्ञेय असलेल्या ०.५ या जादा चटई क्षेत्र निर्देशांकासाठी प्राधिकरणाने आकारणी करावयाच्या अधिमूल्याच्या रकमेची सांगड ही अशा जादा चटई क्षेत्र निर्देशांकाच्या प्रस्तावाला महानगर आयुक्त ज्या तारखेला मान्यता देतील त्या तारखेला प्रचलित असलेल्या चटई क्षेत्र निर्देशांकाच्या बाजार मूल्याशी घालण्याच्या आणि बाजार मूल्याची महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाकडून खातर जमा करून घेण्याच्या प्रस्तावाला मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, संस्थात्मक इमारतींना जादा चटई क्षेत्र निर्देशांक देण्याच्या प्रकरणांमध्ये विकास विषयक परवानगी देण्याच्या प्रक्रियेला गती देण्याच्या हेतूने, महानगर आयुक्तांना याद्वारे एकतर वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" आणि "जीएन" ब्लॉकमधील संस्थात्मक प्रयोजनांसाठी, उदा. शाळा, रूग्णालये इत्यादींना आपली मालमत्ता विकून प्राधिकरणाने मिळविलेल्या भाडेपट्टा अधिमूल्याच्या आधारावर किंवा मुद्रांक शुल्क प्रयोजनांसाठी तयार केलेल्या आणि निवासी जमिनीसाठी असलेल्या संबंधीत सिध्द गणकात विहित केलेल्या दराच्या ११० टक्के या दराने अधिमूल्यादाखल आगाऊ/ठेव रक्कम महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग परिपत्रक क्र. डी. सी. आर. १०९४/४२५/सी. आर-७४/९४/यु. डी-११, दिनांक ९ मे, १९९५ यामध्ये दर्शविलेल्या किंवा त्यामध्ये त्यानंतर केलेल्या फेरबदलांनुसार उपलब्ध असलेल्या सवलतींसह वसूल करण्यास महानगर आयुक्तांना अधिकार देण्यात येत आहेत.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, सुरक्षेच्या दृष्टीने प्राधिकरणाने निश्चित केलेले अधिमूल्य हे ज्या प्रकरणांमध्ये महानगर आयुक्तांनी

...९/-

वसूल केलेल्या आगाऊ/ठेव रकमेपेक्षा अधिक होणार असेल अशा प्रकरणी महानगर आयुक्तांनी कळविल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या अवधीत ही तूट भरून काढण्यासाठी आणि त्यानंतर या रकमेवर दरसाल दरशेकडा १८ टक्के या दराने व्याज देण्यासाठी लाभाधिकारी संस्थेला बंधनकारक ठरणारे एक स्वाक्षरित बंधपत्र करून घेण्यास प्राधिकृत करीत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाने निश्चित केलेले अधिमूल्य हे महानगर आयुक्तांनी वसूल केलेल्या आगाऊ/ठेव रकमेपेक्षा कमी झाल्यास ती जादा रक्कम दरसाल दरशेकडा १२ टक्के या दराने त्यावरील व्याजासह परत करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. १२ : वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र-दोन रेडी-मीक्स कॉंक्रीट संयंत्रे उभारण्यासाठी अल्प मुदतीच्या लायसेन्स तत्वावर दोन भूखंड नेमून देणे.

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६९७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] अनुसार मिळालेल्या अधिकारांचा व याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जीटेक्टर्" ब्लॉकमधील रेडीमिक्स कॉंक्रीट संयंत्रे उभारण्यासाठी असलेले भूखंड क्र. १ व २ साठी आर. एम. सी. रेडीमिक्स [इंडिया] प्रायव्हेट लिमिटेड यांनी रेडिमिक्स कॉंक्रीट संयंत्रे उभारण्यासाठी असलेल्या दोन्ही भूखंडासाठी उच्चतम देकार [रू. २०००/- प्रति चौ. मी. प्रती वर्षी] दिला असल्याने त्यांना त्यांच्या विकल्पाप्रमाणे निवड केलेला भूखंड प्रस्ताविल्याप्रमाणे नेमून देण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण याद्वारे मंजूरी देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, आर. एम. सी. रेडिमिक्स [इंडिया] प्रायव्हेट लिमिटेड यांनी त्यांच्या विकल्पानुसार १[एका] भूखंडाची निवड केल्यानंतर राहिलेला भूखंड दि असोशिएटेड सिमेंट कंपनी लिमिटेड यांना

प्रतिवर्षी रु. २०००/- [रुपये दोन हजार फक्त] प्रति चौ. मीटर या अनुरूप (Matching) उच्चतम दराने प्रस्ताविल्याप्रमाणे नेमून देण्याच्या प्रस्तावासही प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे. वरील दोन्हीही संस्थांना बाब टिप्पणीतील परिच्छेद ७ मधील अटी व शर्ती बंधनकारक रहातील.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, याबाबत करावयाचा करारनामा व ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. "

बाब क्र. १३ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉक मध्ये जमीन मे. टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेडला वीज ग्रहण केंद्र उभारणेसाठी तात्पुरत्या वापरासाठी नेमून देण्याबाबत.

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६९८ :

"असा ठराव करण्यांत येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] ला अनुसरून मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे मे. टाटा इलेक्ट्रीक कंपनीला [टी. ई. सी. ला] वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉक मधील टिप्पणी सोबत जोडलेल्या नकाशा मध्ये दर्शविलेली २५०० चौ. मीटर जमीन दर चौरस मीटरला रु. २/- [रुपये दोन फक्त] प्रतिदिन या भाडयाने तात्पुरते "वीज ग्रहण केंद्र" उभारण्यासाठी तीन वर्षाच्या कालावधीसाठी बाब टिप्पणीत नमुद केलेल्या अटी व शर्ती वर देण्यास मंजूरी देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यांत येत आहे की, याबाबतीत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास व टी. ई. सी. बरोबर जरुर तो करारनामा करण्यांस महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे. "

बाब क्र. १४ : ओशिवरे जिल्हा केंद्रामध्ये चटई क्षेत्र निर्देशांकाची संगणना करतांना जिना, उद्‌वाहन विहिर [लिफ्ट वेल] उद्‌वाहन लघुमार्ग [लिफ्ट लॉबी] उद्‌वाहन कक्ष इत्यादींच्या परिबध्द क्षेत्राची सूट देण्याविषयीचे धोरण.

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६९९ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ च्या पोटकलम [२] अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियम, १९९१ च्या नियम ३५ च्या पोट नियम [२] च्या परिच्छेद [सी] अनुसार अनुज्ञेय असल्याप्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांकाची संगणना करतांना जिने, लिफटवेल इत्यादीच्या परिबध्द क्षेत्राची सूट मागणा-या अर्जदारांवर जिने, लिफटवेल इत्यादीच्या एकूण परिबध्द क्षेत्राच्या ३ % परिबध्द क्षेत्र प्राधिकरणाला खाली नमूद केलेल्या दराप्रमाणे, यथास्थिती, निवासी गाळे किंवा वाणिज्यिक जागा यांच्या स्वरूपात विकण्यास बंधनकारक ठरविणारी अट लादण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना प्रदान करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देत आहे, जसे,

[अ] निवासी गाळे : परिबध्द क्षेत्राच्या दर चौ. मीटरला १०७६०/- रुपये

[ब] वाणिज्यिक जागा : परिबध्द क्षेत्राच्या दर चौ. मी. ला १६१४०/- रुपये

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या अटीच्या कार्यान्वयनाची खात्री करून घेण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही करण्यास आणि अर्जदारासोबत आवश्यक त्या करारपत्रावर सही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत."

...१२/-

बाब क्र. १५ : वडाळा भारवाहक तळ येथील चार इमारतींतील वाटप केलेल्या गाळयाच्या भाडेपट्टा अधिमूल्याची वसूली.

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७०० :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] ला अनुसरून मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे वरील टिप्पणीच्या परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री. आर. आर. शर्मा यांना भाडेपट्टा अधिमूल्याची रक्कम भरण्यासाठी आणखी ३ महिन्यांची मुदतवाढ २०% व्याज आकारून देण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वडाळा भारवाहक तळातील फक्त चार इमारतीमधील परिवध्द गाळयांचे यापुढे वाटप करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [जमिनीची विल्हेवाट] विनियमाच्या नियम ९ [१] मधील तरतुदीखेरीज बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे दर वर्षाला २०% व्याज आकारून भाडेपट्टा अधिमूल्याची राहिलेली रक्कम भरण्यास ठराव क्र. ६६८ अन्वये दिलेल्या सहा महिन्यांच्या मुदती ऐवजी एक वर्षाची मुदतवाढ देण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकरण याद्वारे प्राधिकृत करणारी सर्वसाधारण मंजूरी देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी पुढील सर्व उपाययोजना करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. १६ : पवई क्षेत्र विकास योजना

१६. १ या बाबीवरील चर्चेच्या वेळी खालीलप्रमाणे प्रतिपादन करण्यात आले :-

मे. मुकंद लि. यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये १९८२ साली प्राधिकरणाने त्यांची जमीन संपादित करु नये असे आदेश देण्यासाठी एक रिट याचिका सादर केली होती तसेच मुकंद यांनी सदर रिट याचिकेमध्ये दिनांक २४ सप्टेंबर, १९८८ रोजी बदल करु द्यावेत अशी विनंती मुंबई उच्च न्यायालयाला केली. सादर केलेल्या बदलाप्रमाणे प्राधिकरणाने त्यांची जमीन

संपादित करून त्या जमीनीच्या विकासासाठी त्रिपक्षीय करार करावा असे निदेश द्यावेत अशी विनंती मुंबई उच्च न्यायालयाला मे. मुकंद यांनी केली होती. श्री. अजय मोहन यांनी सुध्दा मुंबई उच्च न्यायालयामध्ये १९९३ साली रिट याचिका सादर केली आहे व त्यामध्ये प्राधिकरणाने त्यांची जमीन संपादित करून त्यांच्या विकासासाठी त्रिपक्षीय करार करावा अशी विनंती केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी राज्य शासनाने मान्य केलेल्या विकास आराखड्याप्रमाणे श्री. अजय मोहन यांची जमीन महानगर निगम व इतर केंद्र शासनाच्या अंगीकृत संस्थांसाठी आरक्षित केलेली आहे.

१६.२ मे. मुकंद लि. व श्री. अजय मोहन यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे रिट याचिका दाखल केल्या असल्यामुळे या बाबीचा विचार प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने करावा अशी सूचना करण्यात आली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या कलम ७ चे पोटकलम [३], खंड क्र. [सहा] अनुसार प्राधिकरणाच्या वतीने कोणतीही कायदेविषयक कार्यवाही दाखल करणे, चालविणे व मागे घेणे याबाबतचे अधिकार प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीस दिलेले आहेत असे या बाबतीत निदर्शनास आणण्यात आले. त्यामुळे या बाबीचा प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने सांगोपांग विचार करून याबाबतीत प्राधिकरणाने कोणती कार्यवाही करावी या बाबत शिफारस करावी अशी विनंती कार्यकारी समितीस करण्याचे ठरविण्यात आले. तसेच जरूर वाटल्यास कार्यकारी समितीने संबंधीत पक्षकाराचे म्हणणे ऐकून घ्यावे असेही सूचविण्यात आले.

१६.३ वर नमूद केल्याप्रमाणे या विषयावरील पुढील विचार लांबणीवर टाकण्यात आला.

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

.................

सौ. जाधव